कि. दि. अर्ज क्र. १४/२०२६
नरेंद्रसिंह वि. निरंक
CNR-MHAK090000892026

**आदेश नि.क्र. ०१ वर**
(दि.१६.०३.२०२६)

प्रस्तुतचा अर्ज मुंबई नियमन कायदा (Bombay Regulation Act) १८२७ च्या कलम २ अन्वये वारसाचे प्रमाणपत्र मिळणेबाबत दाखल केला आहे.

२. प्रस्तुत अर्जामध्ये अर्जदारांचे असे कथन आहे की, मयत **विरेंद्रसिंह रामचंद्रसिंह चौहान** यांचा अर्जदार हा भाउ आहे. **विरेंद्रसिंह रामचंद्रसिंह चौहान** यांचा मृत्यु **दि.१६.१०.२०२५** रोजी मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला येथे झाला. मयत विरेंद्रसिंह यांची आई रामकलीबाई व वडील रामचंद्रसिंह यांचा मृत्यु विरेंद्रसिंह लहान असतांनाच झाला. मयत विरेंद्रसिंह हे अविवाहीत होते व त्यांना कोणतेही मुलबाळ नव्हते.

३. अर्जदारानी असे सादर केले आहे की, अर्जदार हीच केवळ मयत **विरेंद्रसिंह रामचंद्रसिंह चौहान** यांची कायदेशीर वारस आहे. अर्जदाराला अधिकृत हेतू आणि खाजगी वापरासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्र आवश्यक आहे. म्हणून, उपस्थित अर्ज.

४. दि.१७.०१.२०२६ रोजीच्या आदेशान्वये सायटेशन नोटीस, वृत्तपत्रामधील जाहीर नोटीस प्रसिद्ध केल्या. सायटेशन नोटीसची बजावणी दि.२३.०२.२०२६ रोजी झालेली असून ती **निशाणी-०६** वर दाखल आहे. दैनिक "**विदर्भ मतदार**" या वृत्तपत्रामध्ये दि.२८.०१.२०२६ रोजी प्रसिध्द केलेल्या जाहीर नोटीसची प्रत **निशाणी-१४** वर अभिलेखावर दाखल केली आहे. आजपर्यंत सदर अर्जास कोणीही आक्षेप घेतला नाही. अर्जदारानी सदरहु अर्जासोबत मयत **विरेंद्रसिंह रामचंद्रसिंह चौहान** यांचे मृत्युचे मुळ प्रमाणपत्र **निशाणी-१०** वर दाखल केले आहे. अर्जदारानी अर्जदाराची आधारकार्डांची पडताळणी केलेली प्रत **निशाणी-१२** वर दाखल केली आहे.

५. अर्जदार **नरेंद्रसिंह रामचंद्रसिंह चौहान** यांनी आपल्या कथनाच्या पुष्ठयर्थ पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **निशाणी-०९** वर दाखल केले आहे. त्यामध्ये त्यांनी त्यांच्या अर्जाप्रमाणे कथन केले

आहे. त्यांच्या पुराव्यावरुन असे दिसुन येते की, मयत **विरेंद्रसिंह रामचंद्रसिंह चौहान** यांचे अर्जदाराव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. अर्जदाराच्या कागदोपत्री आणि तोंडी पुराव्यावरून असे दिसून येते की, अर्जदार ही मयत **विरेंद्रसिंह रामचंद्रसिंह चौहान** यांची कायदेशीर वारस आहे. अशा प्रकारे, ते 1827 च्या बॉम्बे रेग्युलेशन VIII च्या कलम-2 अंतर्गत अर्जदार ही वारस प्रमाणपत्र देण्यास पात्र आहे. मयत हा मुर्तिजापूर अधिकारक्षेत्रातील कायम रहिवासी होता. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश देत आहे. म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजुर करण्यात येतो. |
| २. | अर्जदार :-<br>**१. नरेंद्रसिंह रामचंद्रसिंह चौहान,**<br>रा. सुभाष चौक, स्टेशन विभाग, मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला.<br><br>हे, **विरेंद्रसिंह रामचंद्रसिंह चौहान**, ज्यांचा मृत्यु **दि.१६.१०.२०२५** रोजी मुर्तिजापूर, ता. मुर्तिजापूर, जि. अकोला, यांचे कायदेशीर वारस आहेत. |
| ३. | अर्जदारांनी नियमानुसार न्यायालयीन शुल्क भरावा. |
| ४. | **टिप-** सिवील मॅनुअल परिच्छेद क्र.३१२ चा वारस प्रमाणपत्रामध्ये उल्लेख करण्यात यावा. |

RADHARAMAN RAMDAS PAKADE

Digitally signed by RADHARAMAN RAMDAS PAKADE
Date: 2026.03.17 17:14:09 +0530

**दि. १६.०३.२०२६**

**( आर.आर. पकडे )**
**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,**
**मुर्तिजापूर.**

# <u>C E R T I F I C A T E</u>

I affirm that the contents of this P.D.F. File Order/Judgment are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | S. R. Adhau |
| Name of the Court | Jt. Civil Judge (J.D.) & J.M.F.C., Murtizapur. |
| Date of Order/Judgment | 16.03.2026 |
| Order/Judgment Signed by the P.O. On | 16.03.2026 |
| Judgment/Order uploaded on | 18.03.2026 |